केंद्र शासनाच्या “निवासी शाळा” योजनेनुसार एकलव्य निवासी शाळा सुरू करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-केंजजाका-२०१८/प्र.क्र.५१९/का.१३**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २८ मे, २०१९.

**<u>वाचा:</u>** १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शाआशा- १०००/प्र.क्र.४८/का.१३, दि.११ सप्टेंबर, २०००.
२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शाआशा- २०१३/प्र.क्र.६८२/का.१३, दि.७ मे, २०१५.
३) भारत सरकार, जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे क्र.१८०१५/१५/२०१८-Grants, दि.२१/२/२०१९.

**<u>प्रस्तावना:-</u>**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतूने नवव्या पंचवार्षिक योजनेत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अन्वये वितरीत होणाऱ्या निधीतून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्य स्तरावर निवासी शाळा स्थापन करण्याचा केंद्र शासनाने निर्णय घेतला आहे. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि.११ सप्टेंबर २००० नूसार राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात पहिल्या टप्प्यात सन २०००-०१ पासून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी १) नाशिक (नाशिक) २) कांबळगाव (ठाणे) ३) चिखलदरा (अमरावती) ४) खैरीपरसोडा (नागपूर) येथे केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड, नवी दिल्ली यांच्या अभ्यासक्रमानूसार इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंत वर्ग असलेल्या एकलव्य निवासी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. तसेच सदर शाळांसाठी शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व त्यांची वेतनश्रेणी निश्चित करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या मान्यतेनूसार आदिवासी/आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागातंर्गत सद्यस्थितीत १६ एकलव्य निवासी शाळा सुरू आहेत. त्यापैकी चार्मोशी, जि. गडचिरोली व टिटवे, जि. नाशिक या दोन शाळांना आदिवासी विकास विभागाने अद्याप सदर शाळांना मान्यतेचे औपचारीक आदेश निर्गमित करण्यात आले नाहीत. सबब, केंद्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक तत्वानुसार भारतीय संविधानाच्या २७५ (१) अन्वये केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदान लक्षात घेता

नव्याने एकलव्य निवासी शाळा दहा ठिकाणी एकलव्य निवासी शाळा सुरू करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णयः-**

केंद्र शासनाच्या निवासी शाळा योजनेनूसार खालील ठिकाणी सी. बी. एस. ई. बोर्डाच्या इंग्रजी माध्यमाच्या इ.६ वी ते इ.१२ वी पर्यंतच्या एकलव्य निवासी शाळा सुरू करण्यास शासन मंजूरी देत आहे :-

(१) चामोर्शी, जि. गडचिरोली
(२) टिटवे, जि. नाशिक
(३) पांढरकवडा, जि. यवतमाळ
(४) धडगांव, जि. नंदूरबार
(५) सवणे तलासरी, जि. पालघर
(६)जव्हार, जि. पालघर
(७) नवापूर, जि. नंदूरबार
(८) अक्कलकुवा, जि. नंदूरबार
(९) कळवण, जि. नाशिक
(१०) कुरखेडा, जि. गडचिरोली
(११) सुरगाणा, जि. नाशिक

उक्त सर्व शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड, नवी दिल्ली यांच्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाईल.

२. संदर्भाधीन क्र.१ व २ येथे नमूद शासन निर्णयातील तरतूदी उपरोक्त दहा एकलव्य निवासी शाळांना लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१९०५२८१७३४००४१२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावांने.

**( ल. गो. ढोके )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.४०० ०३२.
३. मा.मंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई- ४०० ३२.

४. सर्व मा. मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास ), मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
६. सर्व मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. सर्व मा. विधानसभा सदस्य.
८. सर्व मा. विधानपरिषद सदस्य.
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. सचिव, भारत सरकार, जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली.
११. संचालक, भारत सरकार, जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली.
१२. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण), शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१६. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१७. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१८. जिल्हाधिकारी, गडचिरोली, नाशिक, यवतमाळ, पालघर व नंदूरबार.
१९. अपर आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नागपूर / नाशिक/ ठाणे / अमरावती.
२०. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२१. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२२. महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२३. महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
२४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक/नंदूरबार/गोंदिया/गडचिरोली.
२५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
२६. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक, यवतमाळ, पालघर व नंदूरबार.
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२८. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२९. सर्व उप सचिव/ अवर सचिव/कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.
३०. उप सचिव ( व्यय-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३१ कक्ष अधिकारी (का.१९), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३२. निवडनस्ती (का-१३) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.

*******